**ठळक बातम्या**

- राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी देशहितासाठी कार्यरत राहण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन
- महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ काल विधानपरिषदेत बहुमतानं मंजूर
- इंदूर इथे इलेक्ट्रिक चार्जिंग पॉईंटच्या स्फोटात एकाच घरातल्या ७ जणांचा मृत्यू

**आणि**

- इराणचे राष्ट्रीय सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांचा इस्त्रायलच्या हल्ल्यात मृत्यू

**<><><><><><>**

राजकारणात सक्रीय असलेल्या व्यक्तींच्या आयुष्यात कधीच पूर्णविराम नसतो, त्यामुळे कार्यकाळ संपल्यानं राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांनीही यापुढेही देशहितासाठी कार्यरत रहावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या ५९ सदस्यांना आज निरोप देण्यात आला त्यावेळी तेबोलत होते.

प्रधानमंत्री मोदी यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसंच निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी संसदेत उल्लेखनीय काम केलं असून ते सदैव लक्षात राहील, अशा भावना व्यक्त केल्या.

राज्यसभेतून निवृत्त होणारे एच. डी. देवेगौडा, मल्लिकार्जुन खर्गे आणि शरद पवार यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी आपल्या आयुष्यातील अर्ध्याहून अधिक काळ संसदीय कार्यासाठी समर्पित करत नवीन खासदारांसमोर निष्ठा आणि समाजसेवेचा एक आदर्श घालून दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी दिलेलं योगदान वाखाण्याजोगं असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><><>**

एक देश एक निवडणूक धोरणाशी संबंधित कायदेशीर बाबींची तपासणी करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचा कार्यकाळ यंदाच्या पावसाळी अधिवेशनापर्यंत वाढवण्यात आला आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत ही मुदतवाढ असेल. या समितीचे सदस्य पी. पी. चौधरी यांनी संविधानाच्या १२९व्या दुरुस्ती विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२४अन्वये आज लोकसभेत हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

<><><><><><>

सरकारनं देशातंर्गत सौर उत्पादनाला चालना देण्यासाठी एएलएमएम अर्थात मॉडेल्स आणि उत्पादकांच्या मंजूर झालेल्या यादीचा विस्तार केला आहे. या यादीत आता सौर ऊर्जा आणि सेमीकंडक्टर्स उपकरणं तयार करण्यासाठी लागणारे प्राथमिक घटक इंगोट्स आणि वेफर्स यांचाही समावेश झाला आहे. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं तिसरी एएलएमएम यादी लागू करण्याची घोषणा केली असून जून २०२८ पासून ती अंमलात येणार आहे. त्यानंतर सर्व सौर प्रकल्पांना एएलएमएम मान्यताप्राप्त वेफर्स वापरणं बंधनकारक असेल. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद  जोशी यांनी हा निर्णय भारताच्या सौर उत्पादन परिसंस्थेला बळकटी  देणारे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं समाज माध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><><>

सरकारनं “युथ खेलो इंडिया फेडरेशन” नावाच्या एका संस्थेचा पर्दाफाश केला आहे. ही संस्था सरकार आणि भारतीय ऑलम्पिक संघटनेशी संलग्न असल्याचा खोटा दावा करत “थायलंड आंतराष्ट्रीय क्रीडास्पर्धा २०२६” मध्ये सहभागी होण्यासाठी प्रत्येक खेळाडूकडून सुमारे ८२५ अमेरिकन डॉलर्स प्रवेश

शुल्क आकारत आहे. या संस्थेला सरकारची मान्यता नाही तसंच ती कोणत्याही सरकारी संस्थेशी संलग्न नाही, असं स्पष्टीकरण पीआयबी अर्थात पत्र सूचना कार्यालयाच्या तथ्यता पडताळणी विभागाने समाज माध्यमावरच्या संदेशात दिलं आहे. भारतीय क्रीडा प्राधिकरण कोणत्याही खासगी संस्थेला अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडूंकडून सहभाग शुल्क गोळा करण्याची परवानगी देत नाही, असंही स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ काल विधानपरिषदेत बहुमतानं मंजूर झालं. विधानसभेत या विधेयकाला दोन दिवसांपूर्वी मंजुरी मिळाली होती. या विधेयकाचा उद्देश कुठल्याही एका धर्माला लक्ष्य करणं नसून सर्व धर्मांसाठी तो सारखा राहील, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी या विधेयकावरच्या चर्चेच्या उत्तरात दिली. हे विधेयक स्वेच्छेनं होणारं धर्मांतर थांबवत नाही, कोणाच्याही धर्मस्वातंत्र्यावर घाला घालत नाही. केवळ गैरमार्गानं केलं जाणारं धर्मांतर थांबवणं हा या विधेयकाचा हेतू आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यघटनेनं दिलेलं धर्मस्वातंत्र्य हे निरंकुश नाही, चुकीच्या गोष्टी होत असतील, तर त्यासाठी कायदा करायचा अधिकार सरकारला आहे, असं ते म्हणाले. धर्मांतर नक्की स्वेच्छेने होत आहे ना, याची खात्री करण्यासाठी ६० दिवसांची आगाऊ सूचना देण्याची आणि धर्मांतर झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत तशी माहिती स्थानिक संबंधित अधिकाऱ्यांना कळवण्याची सक्ती यात केली आहे. अनेकदा पीडित व्यक्तीमध्ये स्वतःवरच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद नसते. म्हणून नातेवाईकांना तक्रार दाखल करायचा अधिकार यात दिला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><><>**

राज्यातल्या विविध अभ्यासक्रमांसाठी मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीतला केंद्र सरकारचा वाटा थेट त्या त्या संस्थांच्या खात्यात जमा करता येईल का, याबाबत केंद्राला विनंती केली आहे, लवकरच याबाबत केंद्राच्या समितीबरोबर बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढू, असं आश्वासन संजय शिरसाट यांनी आज विधानपरिषदेत दिलं. सध्या हे पैसे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होत असून ते पैसे वेळेवर शैक्षणिक संस्थांना मिळत नाहीत, त्या संस्थांचा तगादा सुरू होतो, त्यांच्या कागदपत्रांसाठी अडवणूक केली जाते, याबाबत आमदार किशोर दराडे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात एका बारा वर्षीय मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याचा मुद्दा काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून उपस्थित केला. राज्यात मुली, महिला सुरक्षित नसून गृह खात्याचा कसलाही वचक राहिलेला नाही अशी टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली. या प्रकरणातील आरोपी सापडत नाही, इथले पोलीस अधीक्षक भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत असा आरोप त्यांनी केला. मागच्या काही वर्षांत राज्यात गुन्ह्यात ४० टक्के वाढ झाली आहे, पोलिसांचा धाक गुन्हेगारांना राहिलेला नाही, असं ते म्हणाले.

याच विषयावर बोलू देण्याची मागणी नाना पटोले यांनी केली. मात्र अध्यक्षांनी त्यांना परवानगी नाकारली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी काही सदस्यांना बोलू देण्याचा आग्रह धरला. यामुळे काही काळ सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. त्यानंतर नाना पटोले यांनी हा मुद्दा औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित केला. यावर पोलिसांना योग्य ते निर्देश दिल्याचं अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात इंदूर इथे आज पहाटे इलेक्ट्रिक कार चार्जिंग पॉईटंचा स्फोट झाल्यामुळे लागलेल्या आगीत एकाच घरातल्या ७ जणांचा मृत्यू झाला आहे. इंदूरमध्ये ब्रजेश्वरी ॲनेक्स संकुलात ही दुर्घटना घडली आहे. या चार्जिंग पॉईटंवर इलेक्ट्रिक गाडींच चार्जिंग सुरू होतं. मात्र, स्फोट झाल्यामुळे गाडीला आग लागली. चार्जिंग पॉईटं ज्या घराजवळ होता, त्या घरातल्या गॅस सिलिंडरचाही स्फोट झाल्यामुळे आग आणखी भडकली. या स्फोटानंतर एक लहान मूल बेपत्ता असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या आगीतून तीन जणांना वाचवण्यात यश आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, दिल्लीत पालम परिसरातल्या एका बहुमजली इमारतीला आग लागल्यामुळे सात जणांचा मृत्यू झाला आहे. अग्निशमन दलाच्या ३१ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**<><><><><><>**

इराणचे राष्ट्रीय सुरक्षा प्रमुख अली लारीजानी आणि बसिज दलाचे प्रमुख गुलाम रझा सोलेमानी यांचा इस्त्रायलच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची कबुली इराणे दिली. लारीजानी हे दिवंगत नेते अयातुल्ला अली खामेनी आणि त्यांचे पुत्र मोजतबा खामेनी यांचे निकटवर्तीय होते. इराणच्या फार्स वृत्तसंस्थेनुसार, लारीजानी आणि सोलेमानी यांचा काल रात्री मृत्यू झाला. जानेवारी महिन्यात इराणच्या ४७ वर्षांच्या राजवटीला आव्हान देणारी निदर्शनं इराण मध्ये झाली होती, त्यावेळी ही निदर्शनं दडपण्यासाठी केलेल्या कारवायांमध्ये त्यांची प्रमुख भूमिका होती.

**<><><><><><>**

छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, आणि विदर्भात आज मेघगर्जनेसह अवकाळी पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवत या भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात,

महाराष्ट्र आणि कर्नाटकात आज काही ठिकाणी जोरदार वारे आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.  तसंच जम्मू काश्मीर, लडाख, झारखंड, बिहार, आंध्र प्रदेश, केरळ, माहे, ओदिशा, तेलंगणा, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्येही पावसाची शक्यता आहे.

**<><><><><><>**

भारतीय जाहिरात मानक परिषदनं मुंबईत आयोजित केलेल्या पहिल्या ॲड ट्रस्ट शिखर परिषदेचं आज उदघाटन झालं. जाहिरात ही केवळ व्यवसायिक क्रिया नसून ती बाजारनिर्मिती, ब्रँड उभारणी आणि डिजिटल प्रभाव निर्मितीचं साधन आहे, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे संजय जाजू यांनी याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना सांगितलं. डिजिटल जाहिरात आता वाढीची उत्प्रेरक बनली आहे, असंही ते म्हणाले

**होल्ड---बाईट---- संजय जाजू**

**//<><><><><><>//**